**महाराष्ट्र जनशक्ती** | **ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ७४ वे | दिनांक : ०७/०३/२०२६ | वार : शनिवार

## फडणवीस सरकारची कर्जमाफी तकलादू : राजू शेट्टींसह अजित नवलेंची सरकारवर जोरदार टीका



**मुंबई :** राज्याच्या २०२६ च्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची मोठी घोषणा करण्यात आली आहे. राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना या नावाने ही योजना लागू करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या योजनेनुसार ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीककर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळणार आहे. याशिवाय जे शेतकरी नियमितपणे कर्जफेड करत आहेत, त्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्याची तरतूद देखील करण्यात आली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असली तरी या घोषणेवरून राज्यातील शेतकरी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या निर्णयावर प्रतिक्रिया देताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी या कर्जमाफीला तकलादू, असे संबोधत राज्य सरकारने पुन्हा एकदा शेतकऱ्यांचा विश्वासघात केल्याचा आरोप केला. ऑक्टोबर महिन्यात शेतकरी आंदोलनानंतर झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण कर्जमाफी केली जाईल, असे आश्वासन दिले होते, असा दावा त्यांनी केला. मात्र आता केवळ दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केल्यामुळे अनेक शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहतील, असे त्यांनी सांगितले.

राजू शेट्टी यांच्या मते, राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांची पीककर्ज साडेतीन ते चार लाख रुपयांपर्यंत आहेत. अशा परिस्थितीत दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिल्यानंतर उर्वरित रक्कम भरल्याशिवाय शेतकऱ्यांना पूर्ण दिलासा मिळणार नाही. आधीच आर्थिक अडचणीत सापडलेला शेतकरी दोन लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम कशी भरू शकतो, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. फळ उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती सध्या अत्यंत कठीण असून त्यांनाही या निर्णयाचा पुरेसा फायदा होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सरकारच्या घोषणेमुळे अनेक शेतकरी गोंधळात पडल्याचेही शेट्टी यांनी सांगितले. ऑक्टोबर महिन्यात संपूर्ण कर्जमाफी होईल या अपेक्षेने काही शेतकऱ्यांनी कर्जफेड थांबवली होती. त्यामुळे जे शेतकरी आधी नियमितपणे कर्ज भरत होते, ते देखील आता थकीत झाले आहेत. अशा परिस्थितीत सरकारची ही योजना शेतकऱ्यांसाठी आहे की बँकांच्या फायद्यासाठी आहे, असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता आहे.

दरम्यान, किसान सभेचे राज्य सरचिटणीस अजित नवले यांनीही या निर्णयावर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी कर्जमाफीच्या घोषणेचे स्वागत केले असले तरी ती अपुरी असल्याचे मत व्यक्त केले. त्यांच्या मते, ३० जून २०२६ पर्यंतचे सर्व कर्ज माफ करण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात आली होती. मात्र सध्याच्या निकषांमुळे मोठ्या प्रमाणावर शेतकरी या योजनेपासून वंचित राहू शकतात. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देणे ही त्यांची बोळवण असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करून सर्व शेतकऱ्यांना न्याय मिळेल असा बदल करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## लाडकी बहिण ते लखपती दिदी पर्यंत; महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आराखडा जाहीर



**मुंबई :** राज्याच्या २०२६ च्या अर्थसंकल्पात महिलांच्या सक्षमीकरणाला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्या विकासाला चालना देण्यासाठी विविध योजनांची घोषणा करण्यात आली आहे. विशेषतः मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, महिला बचतगटांचा विकास, तसेच महिलांना आर्थिक साक्षर बनवण्यासाठी प्रशिक्षण यांसारख्या उपक्रमांवर सरकारने भर दिला आहे. या योजनांमुळे राज्यातील लाखो महिलांना आर्थिक आधार मिळणार असून त्यांच्या स्वावलंबनाचा मार्ग अधिक मजबूत होणार आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणात लोकप्रिय ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. या योजनेद्वारे राज्यातील महिलांना थेट आर्थिक सहाय्य दिले जात असून त्यामुळे त्यांच्या दैनंदिन खर्चाला हातभार लागतो. याच योजनेतील लाभार्थ्यांना केवळ आर्थिक मदत देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांना आर्थिक नियोजनाचेही प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महिलांना मिळणाऱ्या आर्थिक लाभाचा योग्य वापर व्हावा आणि त्या आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम व्हाव्यात यासाठी विविध मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

यामध्ये अंगणवाडी सेविकांची महत्त्वाची भूमिका असणार आहे. अंगणवाडी सेविकांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांच्यामार्फत महिलांना आर्थिक साक्षरतेबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. महिलांनी मिळालेल्या पैशाचे योग्य नियोजन कसे करावे, बचत आणि गुंतवणुकीचे पर्याय कोणते असू शकतात, याबाबत त्यांना माहिती दिली जाणार आहे. यामुळे लाभार्थी महिलांना आर्थिक व्यवस्थापनाची सवय लागेल आणि त्यांचा आर्थिक विकास अधिक शाश्वत होईल, असा सरकारचा विश्वास आहे.

याशिवाय राज्यात एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सध्या सर्व जिल्ह्यांमध्ये एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू असून त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास केला जात आहे. या सर्वेक्षणाचा सविस्तर अहवाल तयार करून त्याचे विश्लेषण केल्यानंतर राज्य सरकार एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण जाहीर करणार आहे. या धोरणाच्या माध्यमातून एकल महिलांच्या समस्या, त्यांच्या रोजगाराच्या संधी आणि सामाजिक सुरक्षेच्या उपाययोजनांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देण्यासाठी 'लखपती दिदी' उपक्रमालाही गती देण्यात येणार आहे. राज्यात आतापर्यंत २७ लाख महिलांनी या उपक्रमातून लखपती होण्याचा टप्पा गाठला आहे. आता २०२६-२७ या आर्थिक वर्षात आणखी २५ लाख महिलांना 'लखपती दिदी' बनवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्याचबरोबर महिला बचतगटांनी तयार केलेल्या वस्तूंच्या उत्पादन आणि विक्रीसाठी राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारण्यात येणार आहेत. या मॉलच्या माध्यमातून महिलांनी तयार केलेल्या वस्तूंना मोठी बाजारपेठ मिळेल आणि त्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी भरीव तरतूद
- अंगणवाडी सेविकांना आर्थिक नियोजनाबाबत प्रशिक्षण, योजनेतील लाभार्थ्यांना आर्थिक साक्षर करुन लाभाचे व्यवस्थापन, गुंतवणुकीचे मार्गदर्शन करणार.
- एकल महिला धोरण : सर्व जिल्ह्यात एकल महिलांचे सर्वेक्षण सुरु असून, अहवालाचे विश्लेषण करुन धोरण आणणार.
- लखपती दिदी : राज्यात २७ लाख लखपती दिदी झाल्या, २०२६-२७ मध्ये आणखी २५ लाख लखपती दिदी करणार.
- महिला बचतगटांच्या वस्तु उत्पादन, विक्रीसाठी १३ जिल्ह्यात उमेद मॉल

## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ मार्च २०२६


## माझी माय मराठी

माझी माय मराठी
शब्दसंपदेची खाण
प्रत्येकाला असावा
तिचा अभिमान

माझी माय मराठी
सदा करी प्रबोधन
अखंड तिला जपूनी
करू आपण संवर्धन

माझी माय मराठी
संतसाहित्यात अवतरे
अभंग भारूडातून
अमृताचे वाही झरे

माझी माय मराठी
लोकसंस्कृतीत न्हाली
अभिजात दर्जा मिळूनी
जगी समृद्ध झाली

माझी माय मराठी
शब्दांचा महापूर
सातासमुद्रापार
गुंजे तिचा सूर



**- सौ.कल्पना चालीकवार**
महागाव जि.यवतमाळ

## तुम्हीच सांगा राव!

गरीब श्रीमंतीचे अंतर,
खूप वाढतच चालले.
सदा माणूस माणसाला,
पैशाच्या रूपात तोलले.

गरज पडता समाजात,
गरीबच पुढे धावतो.
आनंदाने श्रीमंत म्हणतो,
गरीब देवासारखा पावतो.

काय करावे या वृत्तीला,
वेळेनुसार बदलत असते.
तुम्हीच सांगा राव आता,
तुम्हाला कसं बरं हे पटते.

आनंदात जातात विसरून,
दु:खात करतात आठवण.
म्हणून म्हणतो माणसा तू,
मानवतेचे कर मनी साठवण.

समजून घ्यावे माणुसकीला,
करू नये कधीच भेदभाव.
धर्मनिरपेक्ष राज्यात माणसा,
हृदयात ठेवावे सदा समभाव.

कशाला पाळतो जगतांना,
गरीब श्रीमंतीचे तू अंतर.
आता शिकून घे रे माणसा,
माणुसकीने जगण्याचे तंतर.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## उत्कृष्ट स्वयंसेविका सरस्वती पाटील व उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. शीला स्वामी यांचा महाविद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात शुक्रवारी (ता. ६) रोजी विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय सेवा योजना व व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा नेतृत्व विकास उद्बोधन शिबिर २०२६ मौजे गडदेवदरी, जि. धाराशिव या ठिकाणी दि. १ ते ५ मार्च दरम्यान पार पडले. या शिबिरात माधवराव पाटील महाविद्यालयातील कु. सरस्वती पाटील, अभिषेक पुजारी, गणेश बिराजदार यांनी सहभाग नोंदवला. या शिबिरात सरस्वती पाटील यांनी अहवाल लेखन, चित्रकला स्पर्धा, पुस्तक परीक्षण, वक्तृत्व स्पर्धा, नाट्य सादरीकरण आदी स्पर्धेत उत्कृष्ट सहभाग नोंदवून जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक, अभिषेक पुजारी यांनी उत्कृष्ट अहवाल लेखन (प्रथम) संसद अभिप्राय (द्वितीय) तर गणेश बिराजदार वक्तृत्व स्पर्धा (द्वितीय), अहवाल लेखन (प्रथम) क्रमांक पटकाविला. उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी म्हणून प्रा. डॉ. शीला स्वामी यांना गौरविण्यात आले. या शिबिरात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन विविध स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते शाल, प्रमाणपत्र व पुष्पहार घालून विशेष सत्कार शुक्रवारी (ता. ६) रोजी करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. सतीश शेळके, डॉ. शिवपुत्र कनाडे, डॉ. राम बजगिरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत, प्रा. अशोक बावगे, प्रा. गोपाळ कुलकर्णी, डॉ. विलास खडके आदींची उपस्थिती होती.

## भारतातील जातिव्यवस्था नष्ट करणारे पहिले राजे राजर्षी शाहू महाराज होते- डॉ. अरुण वाहुळ



**छत्रपती संभाजीनगर :** भारतामध्ये जात आणि धर्म याचा संगम राहिलेला आहे. जातीअंताची लढाई करण्यामध्ये सामान्य कार्यकर्त्यांबरोबरच राज्यकर्त्यांनी सुद्धा जातीअंतासाठी फार मोठे कार्य केलेले आहे. त्यामध्ये जातीअंतासाठी भारतामध्ये पहिल्यांदा राजर्षी शाहू महाराज यांनी फार मोठे योगदान दिलेले आहे असे प्रतिपादन डॉ. अरुण वाहुळ यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग व विद्यार्थी कल्याण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेचा विषय "जातीअंताचा लढा आणि राजर्षी शाहू महाराज"असा होता. राजर्षी शाहू महाराज यांनी यांनी केलेल्या समाज परिवर्तनाचा व जातीचा संघर्ष, वेदोक्त प्रकरण, उदारमतवाद,दक्षिण भारतातील जातीयता, राजर्षी शाहू महाराजांनी केलेले जातीनिहाय वसतीगृह, वेगवेगळ्या शिक्षण संस्था, त्या शिक्षण संस्था मधून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन एक चांगला माणूस घडवण्याचे काम राजर्षी शाहू महाराजांनी केले होते.त्यावेळेस महापुरुष हे फक्त एका जातीत अडकून पडले नाही तर, त्यांनी वेगवेगळ्या जातीतल्या लोकांना त्या जातीचा नेता तयार करण्याचे काम सुद्धा केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शाहू महाराजांनी मदत करून माणगाव परिषदेमध्ये आपल्या भाषणातून त्यांनी तुमच्या समाजातला एक नेता तुम्हाला देत आहे अशी घोषणा केली होती. बहुजन समाजातील मुलांना विविध व्यवसाय करण्यात त्यांनी मदत केली. गंगाराम कांबळे सारख्या एका सामान्य माणसाला हॉटेल सुरू करून देण्याचे काम व त्या हॉटेलमध्ये सर्व जातीच्या लोकांना घेऊन चहा पिण्यासाठी शाहू महाराज स्वतः घेऊन जात असायचे. म्हणून शाहू महाराज हे काळाच्या पुढचे राजे होते असे प्रतिपादन त्यांनी केले.

या व्याख्यानमालेचे अध्यक्षीय समारोप डॉ. सतीश दांडगे यांनी केला. त्यांनी अडीच हजार वर्षांचा जातीअंताचा इतिहासाचा उहापोह करून बुद्धापासून ते आजतागायतचा प्रवास उलगडून दाखवला. बहुजन समाजामध्ये शिक्षण नसल्यामुळे ते जातीमध्ये अडकून पडले आणि राज्य व्यवस्था व प्रशासकीय कामांमध्ये मागासवर्गीय नसल्यामुळे त्यांच्या हजारो पिढ्यांचे नुकसान झालेले आहे. शिक्षणाशिवाय माणसाच्या मनातून जात नाही ती जात आहे. तरी, आज शिक्षण शिकून सुद्धा मोठ्या प्रमाणावर जातीअंत होताना दिसून येत नाही. जोपर्यंत माणसाला जातीव्यवस्थेचा चटका बसल्याशिवाय तो जातीअंताचा लढा लढणार नाही म्हणूनच शाहू महाराजांनी १९०२ मध्ये आरक्षण देऊन मागासवर्गीयांना नोकरीमध्ये सामावून घेतले. त्यामुळे जी समानता आली ती आजपर्यंत काही प्रमाणात टिकून आहे. म्हणून शिक्षणाशिवाय इतर कोणताही पर्याय नाही असे प्रतिपादन डॉ.सतीश दांडगे यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजिका डॉ. पुष्पा गायकवाड यांनी केले. यावेळी विभागप्रमुख डॉ. गीतांजली बोराडे ह्या उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व सहसंयोजक डॉ. राहुल बचाटे यांनी केले तर, पाहुण्यांचा परिचय डॉ. सुवर्णमाला मस्के यांनी केला. आभार प्रदर्शन डॉ. रवि गव्हांदे यांनी केले. ही व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी डॉ. संजय पाईकराव, डॉ.कामाजी डक, अश्विन जोगदंड, डॉ.महेश सरोदे, डॉ. आश्विनी मोरे, प्रियदर्शन हटकर, डॉ. कुमार भवर, सुधीर बलखंडे, सुदेश धराडे, डॉ. सचिन बोराडे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी शहरातील गणमान्य व्यक्ती व संशोधक विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ मार्च २०२६


## श्रीकृष्ण महाविद्यालयात वृक्षारोपण व राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात विज्ञान मंडळाच्या वतीने आज भव्य अशा प्रकाराच्या वृक्षारोपण कार्यक्रम आणि विज्ञान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख वक्ते तालुका उपकृषी अधिकारी मा. प्रवीण पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड, प्रमुख उपस्थितीत मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.आसिया चिश्ती , प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले हे होते. "विज्ञानातील महिला: विकसित भारत उत्प्रेरक" ही संकल्पना घेऊन राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला.प्रमुख वक्ते मा.प्रवीण पाटील म्हणाले की,मी एक कृषी अधिकारी आहे.महाराष्ट्रात आज घडीला चार कृषी विद्यापीठे आहेत.हे सर्व डॉ.वसंतराव नाईक यांचे योगदान आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रात चार कृषी विद्यापीठाची स्थापना झाली. त्यांच्या अथक प्रयत्नातूनच रोजगार हमी योजना महाराष्ट्रात कार्यान्वित झाली.त्यामुळे सिंचनाचे क्षेत्र वाढले.कृषी क्षेत्रात विविध प्रकारचे संशोधन होऊ लागले.हरित क्रांती झाली.हे केवळ आणि केवळ विज्ञानामुळे झाले आहे. विविध खतांच्या माध्यमातून शेतीचे उत्पन्न वाढले त्यामुळे स्वयंपूर्ण होत आले.१९६७ ला महाराष्ट्रात पहिले महात्मा फुले कृषी विद्यापीठ स्थापन होऊन खऱ्या अर्थाने वैद्यानिक संशोधनास सुरुवात झाली.शेतकऱ्यांसाठी संशोधित वाण विकसित झाले.संशोधित सोयाबीन वाणामुळे आज शेतकऱ्यांच्या उत्पादन क्षमतेत विक्रमी वाढ झाली आहे.वेगवेगळ्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून ,माती परीक्षण करून त्या त्या विभागात कोणते संशोधित वाण उपयुक्त ठरते याचा अभ्यास करून, मराठवाडा, विदर्भ, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यासाठी वेगवेगणी वाण तयार केली जातात हे केवळ विज्ञानामुळे शक्य आहे. विज्ञान आणि संशोधन हे एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनी विज्ञान दिनाचे औचित्य सांगून सर्वच क्षेत्रात आज महिला पुरुषाच्या खांद्याला खांदा लाऊन वावरत आहेत. आपल्या दैदिप्यमान कामगिरीने आज महिला सर्वच आघाड्यांवर नेतृत्व करत आहेत. वैज्ञानिक क्षेत्रातसुद्धा महिलांचे प्रमाण लक्षणीय आहे. अंतराळ क्षेत्रात महिलांनी प्रभावी कामगिरी केली आहे,असे प्रतिपादन करून अध्यक्षीय समारोप केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला प्रतिनिधी प्रा. डॉ. मल्लमा आंबुसे यांनी केले. तर आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले केले. त्यानंतर महाविद्यालयाच्या परिसरात विविध प्रकाराच्या वृक्षांचे उत्स्फूर्तपणे विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्राचार्यांच्या समवेत वृक्षारोपण करण्यात आले त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## प्राचार्या ॲड. सविता मुरुमकर विरांगणा सावित्रीबाई फुले नॅशनल फेलोशिप आवार्ड न्यु. दिल्ली पुरस्काराने सन्मानीत



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : मुरुम येथील रहिवाशी प्राचार्या ॲड. सविता संभाजीराव मुरुमकर श्री करिबसवेश्वर माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय कासारसिरसी येथे कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल "भारतीय साहित्य अकादमी न्यु दिल्ली" यांच्या वतीने २०२५-२६ चा विरांगणा सावित्रीबाई फुले फेलोशिप आवार्ड या अंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे. यापूर्वीही त्यांना शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठीत बस्वरत्न पुरस्काराने सन्मानीत, प्रशालेतील अतुलनीय योगदानाबद्दल आदर्श प्राचार्या म्हणून सन्मानीत,कोवीड काळात कोरोनायौध्दा पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे. प्राचार्या मुरुमकर या संभाजीराजे सार्वजनिक वाचनलय मुरुम व आईश्री विनंता बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मुरुमच्या सचिव असून संस्थेच्या माध्यमातुन शैक्षणिक / सामाजिक/राष्ट्रीय कार्य करतात. ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांसाठी वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे मोफत वाचनालय चालवणे,संविधान जागर अंतर्गत संविधानाचे वाटप,प्रतिवर्षी गुणवंत विद्यार्थी गौरव,सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध,कोविड काळात गरजुंना धान्यकिट वाटप, डॉक्टर, नर्सेस, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचाऱ्यांना कोविड पुरस्काराने सन्मानीत,मतदान जनजागृती अंधश्रध्दा निर्मुलनात सक्रीय सहभाग, महिलांना कायदेविषयक सल्ले, पर्यावरण जनजागृती, व्यसनमुक्तीसाठी व्याख्याने/चर्चासत्रे, स्वच्छता अभियान राबवणे, बालसंगोपन/ कुपोषण मुक्त मुले चर्चासत्र, पुरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असे अनेक समाजउपयोगी कार्यक्रम ते राबवितात. मुरुमकर यांच्या सर्व पातळीवरील शैक्षणिक, सामाजिक, राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन त्याचा सन्मान होत आहेत. त्यांना मिळालेल्या सन्मानासाठी सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## धम्मचारी धम्मभूषण यांचा ७० वा वाढदिवस ग्रंथदानाने साजरा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : मुरुम येथील त्रिरत्न बुद्धिस्ट सेंटर धाराशिव चे धम्मचारी धम्मभूषण यांनी आपल्या ७० व्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवत श्री महात्मा बसवेश्वर सार्वजनिक ग्रंथालय यांना ग्रंथ भेट देऊन वाचन संस्कृतीला प्रोत्साहन दिले.या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ग्रंथालयाचे संचालक अमृत भिमराव वरनाळे यांनी धम्मचारी धम्मभूषण यांचे अभिनंदन करत त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. वाढदिवसानिमित्त ग्रंथदान केल्याने समाजात ज्ञानाचा प्रसार होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. यावेळी संचालक माजी प्राचार्य दत्तात्रय हनुमंतराव इंगळे, बाबासाहेब मल्लिनाथ पाटील, पत्रकार मोहन जाधव, अजिंक्य मुरुमकर, महात्मा बसवेश्वर नागरी पतसंस्था चे व्यवस्थापक दत्तात्रय पांडुरंग कांबळे, काशेट्टी प्रशांत गुरुशांतप्पा, चिदानंद कोरणया स्वामी, कंटेकुरे सचिन कल्याणी, नेहा शेवाळकर, राजेंद्र मुदकण्णा आदी मान्यवर उपस्थित होते. धम्मचारी धम्मभूषण यांनी वाढदिवसानिमित्त ग्रंथ भेट देऊन समाजात वाचनाची आवड वाढविण्याचा संदेश दिला. उपस्थितांनी त्यांच्या या उपक्रमाचे स्वागत करून अभिनंदन केले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ मार्च २०२६


## मी लिद्दर आणि महिला दिन

रात्रीचे अडीच वाजलेले
मध्यरात्र...
बाहेर लिद्दर नदीचा
प्रचंड वेगाने वाहण्याचा
आवाज येतोय.
कदाचित, सगळं जग झोपलंय.
पण ती वाहतेच आहे.
कदाचित, साऱ्या जगाला
कळवळून काहीतरी सांगतेय...
सारं जग झोपलंय,
पण मी वाहतेय.
माझं काम मी पूर्ण निष्ठेनं करतेय.
मध्यरात्रीचा भयाण काळोख,
मला थांबवू शकत नाही.
अंधारातला एकाकीपणा
मला घाबरवत नाही...
काल सकाळी, सूर्याच्या कोवळ्या किरणांसोबत जितकी आनंदाने वाहत होते, तितकीच दुपारच्या रणरणत्या उन्हातही मी वाहतच राहिले.
साक्षात आग ओकणाऱ्या सूर्यानं, माझ्या मोठ्या भागाचं वाफेत रूपांतर केलं, पण...
संध्याकाळ होताच पुन्हा मी माझ्या मृदू स्पर्शानं, त्या बाष्पाला देखील पुन्हा माझ्या कवेत वापस आणलं... असं करावंच लागतं...
कारण वाहणं माझं काम.
माझ्या प्रवाहात वाहत आलेल्या प्रत्येकाला
मी सोबत घेतलं...
कोणी निमुटपणे आलं,
तर कोणी तक्रार करत,
माझ्या प्रवाहा विरुद्ध
जाण्याचा प्रयत्न केला.
पण मी प्रत्येकाची झाले.
प्रत्येकाला माझ्या गोठवून टाकणाऱ्या थंड स्पर्शानं आपलंसं केलं...
कदाचित, मी कोणाला तरी मार्ग दाखवला असेल,
कदाचित कोणाचा तरी
पुढचा मार्गच थांबवला असेल...
मग कोणी मला जीवनदायिनी म्हटलं, तर कोणी जीवनहरणी म्हटलं असेल...
दोनही प्रसंगी मी स्थिर राहिले...
कारण वाहणं माझं काम होतं.
माझ्या अंगा खांद्यावर खेळणाऱ्या जड शिळांनाही प्रेमानं कुरवाळून मी गोलाकार दिला, आकर्षक बनवलं...
कोणी चांगलं म्हटलं म्हणून मला थांबायला वेळ नाही.
कोणी वाईट म्हटलं म्हणून रडायला ही वेळ नाही.
इतक्या अविरतपणे काम करत असताना,
कदाचित माझ्या अश्रूंनाही दृश्यमानता नसेल...
पण म्हणून थांबून थोडंच चालेल?

**शब्दरचना**
श्रीमती नीलांबरी वेदपाठक पंडित (नाशिक)
दिनांक १९/४/२०२२
पहलगाम काश्मीर.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com


# संभाजीनगर महापालिका तिजोरीच्या चाव्या सावेंच्या हाती




**छत्रपती संभाजीनगर :** महापालिकेच्या सत्तेचे महत्त्वाचे स्थान असलेल्या आणि आगामी निवडणुकांच्या रसदीचे केंद्र मानल्या जाणाऱ्या स्थायी समितीसह ५ विषय समित्यांवर गुरुवारी (५ मार्च) शिक्कामोर्तब झाले. महापौर समीर राजूरकर यांनी घेतलेल्या या विशेष सभेत राजकीय समीकरणांचा नवा 'अँगल' समोर आला असून, भाजपमध्ये मंत्री अतुल सावे यांनी स्थायी समितीत भाजपच्या वाट्याला आलेल्या ८ जागांवर आपल्या समर्थकांना स्थान मिळवून देऊन स्वतःच्या हाती शहराची सूत्रे असल्याचे सिद्ध केले, तर दुसरीकडे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी नव्या चेहऱ्यांना संधी दिली.

सुरेंद्र कुलकर्णी, अनिल मकरिये आणि माधुरी अदवंत, राजगौरव वानखेडे यांसारख्या अनुभवी सावे समर्थकांना भाजपने संधी दिली आहे. याउलट, शिरसाट गटाने (शिंदे सेना) श्वेता त्रिवेदी आणि राजू राजपूत या नवीन चेहऱ्यांना संधी दिली. उपमहापौर, गटनेता निवडताना शिरसाटांची पीछेहाट झाली होती. मात्र, सदस्य नेमताना त्यांचे मत विचारात घेतल्याचे दिसते. आमदार पुत्र ऋषिकेश जैस्वाल यांना मात्र अजून वाट पाहावी लागणार असल्याचे संकेत पक्षाने दिले.

सुरुवातीला महापौरांनी गटनेत्यांकडे बंद लिफाफ्यात नावे मागितली. या वेळी एमआयएमचे गटनेते सभागृहात नव्हते. नगरसेवकांची त्यांना शोधण्यासाठी धावपळ उडाली. दरम्यान, महापौर राजूरकर यांनी जेव्हा "पाकिटे तातडीने आणून द्या,' असे म्हटले, तेव्हा सभागृहात हशा पिकला आणि महापौरांनाही हसू आवरता आले नाही. मग यांनी समयसूचकता दाखवत 'लखोटा' या शब्दाचा प्रयोग केला.

बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी महापालिकेच्या सत्तेचे केंद्र मानल्या जाणाऱ्या स्थायी समितीवर आपली पकड घट्ट केल्याचे चित्र आहे. शहरात डॉ. भागवत कराड, संजय केणेकर आणि अतुल सावे असे गट सक्रिय होते. मात्र, डॉ. कराड यांची राज्यसभेची मुदत संपल्याने आणि शहराध्यक्ष संजय केणेकर यांची आमदारकी अंतिम टप्प्यात असल्याने भाजपचा मुख्य चेहरा म्हणून आता सावे यांच्याकडेच पाहिले जात आहे. कराड गटाचे खंदे समर्थक मानले जाणारे महापौर समीर राजूरकर हेदेखील आता सावेंशी समन्वय साधत आहेत.

समित्यांच्या रचनेत केवळ राजकीय पुनर्वसन नाही, तर सोशल इंजिनिअरिंग दिसून येते. भाजपने मराठा समाजाचे महापौर केल्यानंतर आता स्थायी समितीचे अध्यक्ष ओबीसी वर्गातून करतील अशी चर्चा आहे. भाजपने विषय समित्यांवर नव्या चेहऱ्यांना पाठवून त्यांच्यातील उत्साह कायम राखला आहे. 'वंचित'च्या लोकसेवा विकास आघाडीने एमआयएमची एक जागा खेचून आणली, हे या सभेचे सर्वात मोठे 'सरप्राइज' ठरले. आता सर्वांच्या नजरा लागल्या आहेत त्या सभापती निवडीकडे.

भाजपने पुढील पाच वर्षांत जास्तीत जास्त निष्ठावान कार्यकर्त्यांना संधी देण्याचे नियोजन केले आहे. याचा थेट फटका ऐनवेळी शिवसेनेतून भाजपमध्ये डेरेदाखल झालेल्या नगरसेवकांना बसताना दिसत आहे. या 'आयात' नगरसेवकांना सध्या तरी कोणत्याही महत्त्वाच्या समितीवर स्थान दिलेले नाही. दुसरीकडे, आमदार संजय शिरसाट यांच्या नेतृत्वाखालील शिंदे गटाने 'जुन्यांना पदे नाही' या धोरणानुसार नव्या दमाच्या फळीला बळ देऊन आगामी निवडणुकीची मोर्चेबांधणी केली आहे.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# स्वतंत्र शैलीचा श्रीधररेषा असलेला चित्रकार : श्रीधर अंभोरे

**म**ला लहानपणापासून निसर्गातील सौंदर्याची प्रचंड व विलक्षण ओढ आहे. कला, चित्र, छायाचित्र, आदी कला मला खूपच भावतात. साहित्य लेखन व वाचन हा माझा आवडता प्रांत असला तरी या कलांनी मला निखळ आनंदच दिला आहे. त्यामुळे चित्रकार, शिल्पकार यांच्याशी मी जोडून घेतले आहे. राजानंद सुरडकर, राजू बाविस्कर, सरदार जाधव, चंद्रमोहन कुलकर्णी, नयन बारहाते, संतुक गोळेगावकर, दासू भगत, जितेंद्र सोळुंके, हे माझे अतिशय आवडते चित्रकार आहेत. यातील बहुतांश चित्रकार हे माझे जवळचे मित्र ही आहेत. या सर्वच चित्रकारांची स्वतःची स्वतंत्र एक शैली आहे. ती त्यांची चित्रशैलीच मला विशेष भावते. त्यामुळेच मी या चित्रकारांशी कायम जोडलो गेलो ते कायमचेच. खरं तर मला चित्रकलेशी विशेष आवड होती, परंतु चित्रकलेसाठी विद्यार्थी दशेत मला विशेष मार्गदर्शन व संधी मिळाली नाही. मात्र मी स्वतःच काही चित्रे कागदावर काढून पहायचो. विशेषतः संत तुकाराम महाराज, हनुमान, गणपती यांची चित्रे मी हुबेहुब काढायचो. त्यापैकी संत तुकाराम महाराज यांचे मोठ्या स्वरूपातील चित्र चुन्याचा वापर करून मी आमच्या घराच्या भिंतीवर दर्शनी भागात काढल्याचे व त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे मला आजही चांगले आठवते. गणपतीचे चित्रही मला चांगलेच जमायचे. गावात कुणाकडे लग्न समारंभ असले की, लोक मला घराच्या भिंतीवर दारावर विवाह सोहळा, अमुक अमुक परिवार आपले सहर्ष स्वागत करीत आहेत. तसेच बाजूला गणपतीचे चित्र मी काढायचो. माझे मराठी हस्ताक्षर ही छान असल्यामुळे मला लोक आवर्जून बोलावयाचे. असे असले तरी माझा हा चित्रकलेचा छंद पुढे मला फारसा जपता आला नसल्याची मनापासून खंत वाटते. कदाचित योग्य ते मार्गदर्शन मिळाले असते तर मी एक चांगला चित्रकार झालो असतो. चित्रकाराप्रमाणे मला पेंटर विषयीही खूपच आदर वाटायचा. त्या काळात पेंटरला खूपच महत्व होते. आपणही चांगला पेंटर व्हावे असेही वाटायचे. कन्नडला आल्यावर ही नंदू शेजवळ या पेंटरकडे मी तासनतास जाऊन बसायचो. कलेची ओढ व आकर्षण मला उपजतच आहे. स्थापत्य व कलाशैली, मूर्तिशिल्प यांचेही विलक्षण आकर्षण आहे. म्हणूनच मी आजपर्यंत हजारो प्राचीन मंदिरांना भेटी दिल्या आहेत. या सर्व कलांनी मला खूपच समृद्ध केले आहे. त्याही पेक्षा आनंदच अधिक दिला आहे. त्यामुळे कला व कलावंत यांच्या विषयी मला प्रचंड आदर व आस्था आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एम.ए. चे शिक्षण घेतांना माझी ओळख डॉ. प्रतिभा अहिरे व राजानंद सुरडकर या कलासक्त दांपत्यांशी झाली. राजानंद सुरडकर सरांचे हस्ताक्षर व चित्र शैलीचा परिचय तिथेच झाला. पुढे योगायोगाने कन्नडला त्यांचा सहवास व प्रेरणा मिळाली. त्यांच्या चित्रशैलीचा विशेष जवळून परिचय झाला. त्यानंतर सरदार जाधव हा अतिशय ताकदीचा चित्रकार यांच्याशी ही मी जोडला गेलो. त्यांच्याकडे तासनतास जाऊन बसायचो. त्यांची चित्रशैली ही मला खूपच आवडते. राजू बाविस्कर, चंद्रमोहन कुलकर्णी, नयन बारहाते त्याच प्रमाणे माझे आणखी एक अत्यंत आवडते चित्रकार म्हणजे श्रीधर अंभोरे. श्रीधर अंभोरे यांचा व माझा तसा परिचय नव्हता. त्यांची चित्रे, व मुखपृष्ठे विविध दिवाळी अंक, पुस्तकातून पहावयास मिळायची. दरम्यानच्या काळात ऊर्मी चा श्रीधर अंभोरे विशेषांक माझ्या वाचनात आला. त्यांच्या जीवन व चित्रशैलीचा परिचय झाला. या चित्रकाराची स्वतःची एक स्वतंत्र शैली आहे. त्यांना आपण कधीतरी भेटले पाहिजे असे मनोमन ठरवूनही मात्र भेट होत नव्हती. काही कार्यक्रमात प्रासंगिक स्वरूपात भेटलोही परंतु चर्चा करता आली नव्हती. श्रीधर अंभोरे हे मुळचे विदर्भातील अकोला येथील ,परंतु नगरला पोष्टात ते नोकरी करायचे. पोस्टात ते पोष्ट मास्तर होते. ३ ७ वर्ष पोस्टात नगरला त्यांनी नोकरी करून आपला छंद जोपासला. नगरला त्यांचे वास्तव्य पन्नास वर्ष होते. जालना येथे त्यांचे ऊर्मी च्या व पुढे आशयघन च्या कार्यक्रमास त्यांचे येणे जाणे होत असल्याचे वर्तमानपत्रातील बातम्यातून वाचायचो. कवितेचा पाडवा या उपक्रमाला ही ते आवर्जून यायचे. त्यांनी लग्न केले नाही. ते एकाकी राहून आपल्या कलेच्या आनंदात रममाण राहिले इतके की, ते कोणत्याही मोह् पाशात अडकले नाही की कुठल्याही बंधनात. कलावंत हा स्वच्छंदी असतो. तो आपल्या विश्वात रममाण होत असतो. तसेच जीवन चित्रकार श्रीधर अंभोरे जगले आजही जगत आहेत. चाळिसगाव चे जगविख्यात चित्रकार कला महर्षी के. की. मूस हा ही असाच अफलातून जगलेला जागतिक दर्जाचा चित्रकार व छायाचित्रकार . मला तर त्यांनी खूपच आकार्षित केले. त्यांच्यावर मी छोटी पुस्तिका ही लिहिली आहे. कोरोना काळात श्रीधर अंभोरे यांना प्रचंड त्रास झाला. ते थेट जालन्याला आले. जालना येथे त्यांचे बंधू राहतात. त्यांचा मोठा परिवार आहे. आता ते त्यांच्याकडेच जालना येथे स्थाईक होऊन आपली कला जोपासत आहेत. आज त्यांचे वय ८० वर्ष आहे. शरिर थकले आहे. तरिही तेवढ्याच जोमाने व उत्साहाने ते कलासाधना करीत आहेत. जालना येथे ते स्थाईक झाल्याचे माझे आणखी एक चित्रकार व सुलेखनकार मित्र कला शिक्षक स्नेही प्रल्हाद कायंदे यांच्याकडून कळाले होते. ते त्यांना भेटूनही आले होते. त्यावेळी श्रीधर अंभोरे सरांनी माझी आठवण काढून तिफणच्या कामाविषयी आपुलकीने चौकशी करून माझी भेट घेण्याची ईच्छा ही त्यांनी व्यक्त केल्याचे कायंदे यांनी सांगितले होते. आपणच वेळात वेळ काढून या आपल्या आवडत्या चित्रकाराची भेट घ्यावी असे खूप दिवसांनी ठरवत होतो. तो योग मात्र जुळत नव्हता. दरम्यानच्या काळात श्रीधर अंभोरे यांच्या विषयी चे महावीर जोंधळे यांचे श्रीधररेषा हे पुस्तक प्रसिद्ध झाल्याचे वाचनात आले. त्याची उत्सुकता ही होतीच. मात्र पुस्तक मिळत नव्हते. अखेर नुकतीच जालना येथे त्यांच्या घरी जाऊन माझ्या आवडत्या चित्रकारांची भेट घेतलीच. बऱ्याच दिवसाची ईच्छा अखेर पूर्ण झाली. चित्रकार श्रीधर अंभोरे सर सध्या जालना येथे वास्तव्यास आहेत. जालना - अंबड - मंठा चौफुली वरून शनिमंदिर रोड जुना जालनाकडे जाणाऱ्या रस्त्याने एका मोठ्या पुलावर अण्णाभाऊ साठे चौकातून उजवीकडे थोडे चालत गेले की डॉ .चाटे यांचे दातांचे हॉस्पिटल आहे. त्याच्या जवळच एक छोटी नर्सरी आहे. तिथूनच थोडे पुढे चालत गेले की गल्लीच्या शेवटी डाव्या बाजून त्यांच्या बंधूचे घर आहे. फोन केल्यावर ते मला घ्यायला बाहेर आले. त्यांनाही प्रचंड आनंद झाला होता. श्रीधर अंभोरे हे चित्रकार म्हणून महाराष्ट्रात व बाहेरही प्रसिद्ध आहेत. निसर्ग सृष्टी व माणूस यांच्या विषयी त्यांना प्रचंड कुतुहल व अपार प्रेम असल्याचे भेटीअंती जाणवले. त्यांनी चित्रकलेचे कोणतेही औपचारिक शिक्षण घेतले नाही. कले विषयीची निष्ठा व आंतरिक प्रेरणा हीच त्यांची प्रेरक शक्ती आहे. नगरला असतांना त्यांनी अनेक वाड्मयीन उपक्रमही घेतले काही काळ ' आदिम ' व ' दिंडी ' ही नियतकालिके काढली. पुढे अनेक पुस्तकांची मुखपृष्ठे व रेखाटणे त्यांनी केली. समाजातील शोषित, वंचित आणि व्यवस्थेने दाबलेल्या , दुर्लक्षित घटकांचे चित्रण त्यांच्या चित्रशैलीत दिसते. मानवी जीवनाकडे ते प्रचंड आस्थेने व बुद्धांच्या करुणेने पाहतात. ही करुणाच त्यांना प्रेरित करते. त्यांची चित्रशैली आगळी वेगळी आहे. डेरेदार झाड. झाडाचे बुंधे, पक्षी, चेहरा नसलेल्या स्त्रीया, गाय, बैल, यांचे प्रभावी चित्रे ते आपल्या कुंचल्यातून साकारतात. या सृष्टीकडे व मानवी समाजाकडे पहाण्याची त्यांची दृष्टी प्रचंड व्यापक आहे. त्यातूनच त्यांची चित्र दृष्टी साकारली आहे. विचारशिलता व चिंतनशीलता हे ही त्यांच्या चित्रांचे आणखी एक विशेष. आतापर्यंत त्यांनी ४०० ते ५०० पुस्तकांचे मुखपृष्ठे साकार केली आहेत. २ ते ३ हजार रेखाटणे काढली आहेत. आजच्या परिस्थिती व बदलत्या वातावरणामुळे तसेच समाजातील वाढता जातीयवाद, विषमता आणि शोषण यामुळे ते प्रचंड अस्वस्थ आहेत. हे कुठेतरी थांबले पाहिजे निखळ माणूस म्हणून जगता आले पाहिजे ही भावना त्यांनी बोलून दाखवली. चळवळी बद्दल बोलतांना ते म्हणाले, की चळवळीची गतिमानता ६० ते ९० पर्यंत होती. २००० नंतर प्रचंड बदल झाले. पिढी बदलली, तंत्रज्ञानाचा हस्तक्षेप वाढला. विचारसरणी बदलली, चळवळीचा उद्देश शुद्ध राहिला नाही. मानवता वादावर आधारित समाज बांधणी झाली नाही. राजकीय क्षेत्राचा हस्तक्षेप व प्रचंड महत्व वाढले. त्याचे परिणाम सर्वच क्षेत्रावर झाले. आमच्या काळाचं जगणं कालबाह्य ठरलं. कुणालाच कुणाचं काही देणं घेणं राहिलं नाही. सर्वच क्षेत्राचं वाटोळं झालं. सोशल मिडिया व मोबाईलचा वापर वाढला. सृजनशिलता संपत चालली आहे. साहित्य, कला, चळवळ, तिफणचे काम, तिफण कविता महोत्सव आदी उपक्रमाबद्दल त्यांनी मनापासून कौतुक केले. कन्नड सारख्या ग्रामीण भागात तुम्ही फारच चांगले काम करत असल्याचे ऐकूण होतो, आज प्रत्यक्ष भेट झाली. त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तिफणचे विशेषांक हे नाविण्यपूर्ण असून वेगळेपण जपणारे आहे. तिफणने चाकोरी मोडून उत्तमोत्तम विशेषांक केले ही अत्यंत महत्वाची गोष्ट असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. आजच्या काळात तुम्ही मोठ्या निष्ठेने साहित्य चळवळीचे काम करीत आहात. तुमच्या एकुणच कामाला मानवी चेहरा असून तुमचे काम हे उपेक्षितांच्या उत्थानाचे काम आहे, तिफण ही निखळ माणूस बनवण्याची चळवळ आहे. हे काम बंद करू नका. असा सल्लाही त्यांनी दिला. तुमच्याकडे कला व सौंदर्य दृष्टी असल्याचे दिसून येते तसेच उपेक्षितांची कणवही जाणवते. तिफणच्या माध्यमातून आपण नवी पिढी घडवण्याचे व वैचारिक पेरणी करण्याचे काम करीत आहात ! माझ्या या कामाला खूप खूप शुभेच्छा ! येत चला ! भेटत चला, असेही ते म्हणाले. विविध विषयावर विस्तृत चर्चा झाली. त्यांची काही चित्रे पहावयास मिळाली. अतिशय साधेपणा त्यांच्या जगण्या वागण्यात व बोलण्यात जाणवला. अहंकाराचा कुठेही लवलेश जाणवला नाही. त्यांच्या विषयी यशवंत मनोहर म्हणतात - " हा रेषानायक रेषांचीच भाषा बोलत राहतो. रेषा हीच या रेषावीराची मातृभाषा होते आणि या मातृभाषेचा मोर त्याच्या अस्तित्वाचा समानार्थ होऊन जातो. या रेषांचं संगीत आपल्यातही उमलत राहतं. या रेषांच्या स्पर्शोत्सवात आपणही कधी मोहरून आलो ते आपल्यालाही कळत नाही . " याचा प्रत्यय त्यांना भेटल्यानंतर नक्कीच येतो. एका वेगळ्या धाटणीचा व चित्राला मानवी चेहरा बहाल करणारा, सामाजिक जाणिवेचा हा महान कलावंत, स्वतंत्र शैलीचा चित्रकार आहे. या वयातही हे जग सुंदर होण्यासाठी, हा भोवतीचा अभाव संपवण्यासाठी आणि कलेला मानवी चेहरा बहाल करीत आपल्या कला साधनेत आकंठ बुडालेला हा महान चित्रकार आणि माणूस म्हणून ही ग्रेटच आहे. याचा प्रत्यय मला आला. त्यांना भेटून बोलून मी समृद्ध झालो. त्यांची भेट घेवून मी माझ्या प्रवासाला निघालो... तिफणचा लोकवाद्ये विशेषांक त्यांना मी भेट दिला.ते मला सोडवायला बाहेर आले. मी जाईपर्यंत ते तिथेच उभे होते. त्यांच्या कार्याला सलाम करून मी माझा रस्ता धरला. एका महान कलावंतास भेटल्याचे समाधान व आनंद घेवून मी या जगरहाटीत सामील झालो. श्रीधररेषा समजून घेता आली. यापेक्षा आणखी काय हवे ?मी धन्य झालो !-

**प्रा. डॉ. शिवाजी हुसे**

(एका भटक्याची शोधयात्रा....)

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०७ मार्च २०२६


# नारीशक्तीचा जागतिक प्रवास : समतेच्या स्वप्नाकडून सशक्तीकरणाच्या वास्तवाकडे

दरवर्षी ८ मार्च हा दिवस संपूर्ण जगभर 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. हा केवळ उत्सवाचा दिवस नाही, तर स्त्रीच्या संघर्षांचा, कर्तृत्वाचा, स्वाभिमानाचा आणि समतेच्या आकांक्षेचा इतिहास पुन्हा एकदा स्मरणात आणणारा आणि भविष्याच्या दिशेने नवी प्रेरणा देणारा दिवस आहे. १९व्या शतकाच्या अखेरीस आणि २०व्या शतकाच्या प्रारंभी औद्योगिक क्रांतीनंतर स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठू लागला. कामगार चळवळींमध्ये स्त्रियांनी समान वेतन, सुरक्षित कामाचे तास आणि मतदानाचा अधिकार यांसाठी संघर्ष सुरू केला. या संघर्षाचे संघटित रूप १९०८ मध्ये अमेरिकेत पाहायला मिळाले. पुढे १९१० मध्ये कोपनहेगन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत जर्मन समाजवादी नेत्या क्लारा झेटकिन यांनी महिला दिन साजरा करण्याची कल्पना मांडली. १९११ पासून काही देशांत हा दिवस साजरा होऊ लागला आणि १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने अधिकृत मान्यता दिल्यानंतर त्याला जागतिक स्वरूप प्राप्त झाले. अशा ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आजचा महिला दिन हा स्त्रीसमानतेच्या दीर्घ आणि खडतर प्रवासाचा प्रतीकात्मक टप्पा आहे.भारतीय समाजरचनेत स्त्रीची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. प्राचीन काळात स्त्री ला देवी समान मानले गेले असले, तरी व्यवहारात स्त्रीला अनेक मर्यादा आणि बंधनांचा सामना करावा लागला. मध्ययुगीन काळात सामाजिक रूढी परंपरांनी स्त्रीच्या शिक्षणावर, स्वातंत्र्यावर आणि सहभागावर बंधने आणली गेली होती. तथापि, १९व्या शतकात समाजसुधारकांच्या चळवळींनी या परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्यास सुरुवात केली. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली; राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेच्या उच्चाटनासाठी लढा दिला; पंडिता रमाबाई यांनी विधवाशिक्षणाचा प्रसार केला. या सुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रीसमानतेचा पाया घातला गेला. स्वातंत्र्यलढ्यातही स्त्रियांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, अरुणा आसफ अली यांसारख्या अनेक महिलांनी नेतृत्व, त्याग आणि धैर्याचे उदाहरण घालून दिले.स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट उच्चार केला. भारतीय राज्यघटनेमधील कलम १४, १५ आणि १६ यांनी कायद्यापुढे समानता, लिंगाच्या आधारावर भेदभावास मनाई आणि समान संधीची हमी दिली. यामुळे स्त्रीच्या अधिकारांना संवैधानिक आधार मिळाला आहे. पुढील काळात स्त्रियांच्या संरक्षणासाठी आणि सशक्तीकरणासाठी अनेक कायदे व योजना राबविण्यात आल्या आहेत. स्त्रीहक्क कायदे, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, मातृत्व लाभ कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा इत्यादींनी स्त्रीसुरक्षेला बळ दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे लाखो महिलांना राजकीय प्रक्रियेत थेट सहभागाची संधी मिळाली आहे. आज ग्रामपंचायतपासून संसदेपर्यंत महिलांचे प्रतिनिधित्व वाढताना दिसते; तरीही संख्यात्मक वाढीबरोबर गुणवत्तापूर्ण आणि प्रभावी सहभागाची आवश्यकता आहे.शिक्षण हा स्त्रीसशक्तीकरणाचा मूलाधार आहे. मागील काही दशकांत मुलींच्या शालेय प्रवेशदरात लक्षणीय वाढ झाली आहे. उच्चशिक्षणातही मुलींचे प्रमाण वाढत आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, कला आणि संशोधन या सर्व क्षेत्रांत महिलांनी आपली छाप पाडली आहे. विज्ञानक्षेत्रात कल्पना चावला यांचे अंतराळयात्रेतील योगदान प्रेरणादायी ठरले आहे; क्रीडा क्षेत्रात पी. व्ही. सिंधू, मेरी कोम यांनी जागतिक स्तरावर यश संपादन केले आहे; राजकारणात इंदिरा गांधी यांनी देशाचे नेतृत्व केले आहे. या उदाहरणांमधून स्त्रीच्या क्षमतेला योग्य संधी मिळाल्यास ती कोणतेही शिखर गाठू शकते, हे अधोरेखित होते. तथापि, प्रगतीच्या या वाटचालीत अनेक आव्हाने अजूनही कायम आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांच्या संधींमध्ये तफावत दिसून येते. काही ठिकाणी मुलींचे शिक्षण माध्यमिक स्तरानंतर खंडित होते. लवकर लग्न, कुपोषण, आरोग्यसेवेची अपुरी उपलब्धता, लैंगिक भेदभाव, कौटुंबिक हिंसा, मानवी तस्करी, कार्यस्थळी छळ, वेतनातील असमानता अशी विविध स्वरूपे स्त्रीच्या विकासाला अडथळा निर्माण करतात. डिजिटल युगातही महिलांचा तंत्रज्ञानातील सहभाग तुलनेने कमी आहे. सायबर छळासारख्या नव्या समस्या उभ्या राहत आहेत. म्हणूनच महिला दिन हा केवळ गौरवाचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवसही आहे. आर्थिक सशक्तीकरण हा स्त्रीच्या स्वावलंबनाचा कणा आहे. स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांनी बचत, सूक्ष्म वित्त आणि लघुउद्योगाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, खाद्यप्रक्रिया उद्योग अशा विविध उपक्रमांत महिलांचा सहभाग वाढत आहे. शहरी भागात उद्योजकतेकडे महिलांचा कल वाढत असून स्टार्टअप संस्कृतीतही त्या पुढे येत आहेत. मात्र, भांडवलाची उपलब्धता, बाजारपेठेचा विस्तार आणि कौशल्यविकास यांसाठी अधिक धोरणात्मक पाठबळ आवश्यक आहे. समान वेतनाची अंमलबजावणी आणि कार्यस्थळी सुरक्षित वातावरणाची हमी देणे ही शासन व समाज दोघांची जबाबदारी आहे. सामाजिक-सांस्कृतिक स्तरावर स्त्रीची प्रतिमा बदलण्याची गरज आहे. माध्यमांमध्ये स्त्रीचे वस्तुकरण टाळणे, मुलगा मुलगी भेदभाव नष्ट करणे, घरगुती जबाबदाऱ्या समसमान वाटून घेणे, पालकत्वाची जबाबदारी दोघांनी स्वीकारणे या मूल्यांचा प्रसार झाला पाहिजे. लिंगसंवेदनशील शिक्षण आणि समाजीकरणामुळे पुढील पिढी अधिक समताधिष्ठित विचार स्वीकारू शकेल. महिला दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शासन विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात; परंतु या उपक्रमांचा परिणाम वर्षभर टिकणारा असणे महत्त्वाचे आहे.आजच्या काळात स्त्री नेतृत्वाचे विविध आयाम दिसून येतात. प्रशासन, न्यायव्यवस्था, विज्ञान-तंत्रज्ञान, संरक्षण, कला, साहित्य, माध्यमे अशा सर्व क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील महिला सरपंचांनी गावविकासाची दिशा बदलली आहे; स्वयंसेवी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे; संशोधक महिलांनी नवकल्पना साकारल्या आहेत. या सर्व उदाहरणांमुळे स्त्रीशक्तीचे व्यापक आणि बहुआयामी स्वरूप स्पष्ट होते. मात्र, प्रतिनिधित्वाची संधी सर्व स्तरांपर्यंत पोहोचावी, यासाठी संरचनात्मक अडथळे दूर करणे आवश्यक आहे.आंतरराष्ट्रीय पातळीवरही महिला सशक्तीकरण हा विकासाचा प्रमुख अजेंडा ठरला आहे. लिंगसमानता ही शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाची संकल्पना आहे. शिक्षण, आरोग्य, आर्थिक संधी, राजकीय सहभाग आणि हिंसामुक्त जीवन या सर्व घटकांचा समावेश लिंगभाव न्यायात होतो. महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक देश आपापल्या प्रगतीचा आढावा घेतो आणि उर्वरित अंतर भरून काढण्यासाठी धोरणे आखतो. भारतानेही 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ', 'उज्ज्वला', 'सुकन्या समृद्धी' यांसारख्या योजनांद्वारे मुलींच्या सक्षमीकरणाचा प्रयत्न केला आहे; परंतु या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती तितकीच गरजेची आहे.स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न केवळ महिलांचा नसून संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी निगडित आहे. ज्या समाजात स्त्रीला सन्मान, सुरक्षा आणि संधी मिळतात, तो समाज अधिक सर्जनशील, समताधिष्ठित आणि प्रगतिशील बनतो. घर, शाळा, कार्यक्षेत्र आणि सार्वजनिक जीवन या सर्व स्तरांवर लिंगसमानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. पुरुषांनीही या परिवर्तन प्रक्रियेत सक्रिय सहभागी होणे गरजेचे आहे. कारण समानतेची लढाई ही परस्पर विरोधाची नसून सहकार्याची आहे. महिला दिन आपल्याला भूतकाळातील संघर्षांची आठवण करून देतो, वर्तमानातील यशाचा गौरव करतो आणि भविष्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देतो. आज घोषणांपेक्षा कृतीची, प्रतीकात्मक सन्मानापेक्षा वास्तविक संधींची आणि तात्पुरत्या उत्साहापेक्षा सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे. प्रत्येक मुलीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, सुरक्षित वातावरण, आरोग्यसेवा आणि स्वप्नपूर्तीची संधी मिळाली पाहिजे. प्रत्येक महिलेला निर्णयप्रक्रियेत स्थान, आर्थिक स्वावलंबन आणि सन्माननीय आयुष्याचा अधिकार मिळाला पाहिजे.८ मार्चचा दिवस हा केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नसून समाजपरिवर्तनाची प्रेरणा आहे. स्त्रीच्या कर्तृत्वाला मान्यता देताना तिच्या वेदनांना आणि संघर्षांना विसरून चालणार नाही. समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी शासन, समाज आणि कुटुंब या तिन्ही स्तरांवर एकात्मिक प्रयत्नांची गरज आहे. नारीशक्तीचा सन्मान, संरक्षण आणि सशक्तीकरण हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

ईमेल - bagate.rajendra5@gmail.com



जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-